ऑफि.जन.१ / NC-50 / २०२२–२३/3099 १५ मार्च, २०२३.

**परिपत्रक**

**सर्व संलग्नीत/संचलित महाविद्यालयांचे संचालक/प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांच्या अवलोकनार्थ व पुढील आवश्यक कार्यवाही करीता सादर.**

**विषय : ॲकेडमीक ऑडीट पोर्टलवर माहिती अद्यावत करणेबाबत सूचना**

**संदर्भ :ऑफि.जन.१/परिपत्रक/२०२२–२३/२२८४, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२२**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ चे कलम ११७ अंतर्गत, संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था, महाविद्यालयाचा किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा ठरवणे विद्यापीठाला शक्य व्हावे म्हणून "महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची तपासणी अहवाल" या शिर्षकाअंतर्गत खालील कार्यपध्दती विशद केलेली आहे.

११७ (१) प्रत्येक संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था, महाविद्यालयाचा किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा ठरवणे विद्यापीठाला शक्य व्हावे म्हणून विद्यापीठ निर्देश देईल असे अहवाल, विवरणे व इतर तपशील सादर करील.

(२) प्र–कुलगुरू, त्याने त्याबाबतीत नियुक्त केलेल्या एका किंवा अधिक समित्यांकडून प्रत्येक विद्यापीठ विभागाची किंवा परिसंस्थेची, संलग्न महाविद्यालयाची किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेची, प्रत्येक तीन वर्षांतून किमान एकदा तपासणी करण्याची व्यवस्था करील आणि त्या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :

(क) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता — अध्यक्ष

(ख) विद्यापरिषदेकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशी, विद्यापीठाशी अथवा त्याच्या अधिकारितेतील कोणत्याही संलग्न महाविद्यालयाशी किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेशी संबंधित नसलेली एक तज्ञ व्यक्ती

(ग) व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशित करण्यात यावयाची एक तज्ञ व्यक्ती

(घ) अधिसभेकडून नामनिर्देशित करण्यात यावयाची एक तज्ञ व्यक्ती

परंतु, अशा समितीवरील कोणताही सदस्य संबंधित महाविद्यालय किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाशी संबंधित नसेल.

(३) समिती आपला अहवाल प्र—कुलगुरूकडे, त्याच्या विचारार्थ आणि आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करील.

यासअनुसरून उपरोक्त नमुद संदर्भिय परीपत्रकाच्या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यास उपरोक्त विषयाबाबत, संदर्भिय परीपत्रान्वये, ऑनलाईन ॲकेडमीक ऑडीट या पोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत (परिपत्रकाचे अवलोकन करावे). पोर्टलवरील माहितीची तपासणी केली असता असे निर्दशनास आले की, ॲकेडमीक ऑडीट करीता पात्र महाविद्यालयांपैकी केवळ ३९ महाविद्यालयांची माहिती नोंद पार्टलवर केलेली आहे.

सदर परीपत्रकाव्दारे उर्वरीत पात्र महाविद्यालय प्रशासनास सुचित करण्यात येते की, दिनांक २०/०३/२०२३ पर्यंत aau-sndt.mu.ac.in या लिंकव्दारे महाविद्यालयाची माहिती ॲकेडमीक पोर्टलवर अद्यावत करावी. जे महाविद्यालय माहिती अद्यावत करणेबाबत कसुर करतील त्या महाविद्यालयांस शैक्षणिक वर्ष २०२३—२४ चे संलग्नीकरण पत्र प्रलंबित ठेवण्यात येईल.

पोर्टलवर माहितीची नोंद करतेवेळेस काही अडचणी / अडथळे उद्‌भविलयास
Email-
1-collegecomu@affiliation.sndt.ac.in,
2- affiliation@sndt.ac.in ईमेलवर स्क्रीन शॉट व लिहून पाठवाव्यात.

(डॉ. मेधा तापिआवाला)
संलग्नता विभाग (अति.भार)

प्रत: १.प्र—कुलगुरू कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
२.कुलसचिव कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
३.श्री. निलेश कासले, एज्युकेशन टेक्नॉलॉजी, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू,
४.समन्वयक, मे.निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिसेस प्रा.लि, नागपूर सदर परिपत्रक ॲफिलेशन पोर्टलवर प्रसिध्द करावे.

d:\pallavi\affiliation (pallavi)\letter\marathi letter.docx